**किरकोळ..फौ.ख. क्र.३५५/२०२५**
**अनिल वि. महेश.**

**फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २२३ अंतर्गत फिर्यादीचे शपथेवर सत्यापन**
**मी प्रतिज्ञेवर कथन करतो ते येणेप्रमाणे,**

माझे नांव - अनिल सदाशीव हुलावळे,
वय- ४७ वर्षे, व्यवसाय:- खाजगी नोकरी,
रा. कारला, जि. पुणे.

**०१.** दि. १०/०२/२०२४ रोजी मी मळवली येथे भुखंड खरेदीच्या शोधात असताना मला गैरअर्जदार महेश यांनी सांगितले की, ५००० चौ.फुटाचा खुला भुखंड, गट क्र. ५१, ५२, ५४ व ५५, प्लॉट क्र. १६ हा विक्रीस असल्याचे सांगून आम्हाला दाखवीला. तसेच प्लॉटमधील खुली जागा ही नंतर कमी करून देण्याचे आश्वासन दिले. त्याप्रमाणे गैरअर्जदार यांनी आम्हाला खरेदीपावती व विसारपावती करून दिली. त्यास मोबदला म्हणून मी रू. ११ लाख गैरअर्जदार यांना आर.टी.जी.एसद्वारे पाठवीले. त्यानंतर आम्ही भुखंडावर बांधकाम सुरू केले. त्यानंतर एक महिन्याने गैरअर्जदार यांनी आम्हाला भुखंडावर बांधकाम न करण्याचे व त्याबाबत त्यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्याचे कळवीले. त्यानंतर गैरअर्जदार यांनी मला ॲमेनीटी सुविधाचा प्लॉट देणार असल्याचे कबुल केले. ॲमीनीटी शेरा कमी करण्याकरीता गैरअर्जदार यांनी आमच्याकडे रू. दिड लाख मागणी केली. दि. ०८/०४/२०२५ रोजी गैरअर्जदार यांनी आम्हाला खरेदी करून देण्याचे आश्वासन दिले. त्यास आम्ही मूद्रांक शुल्क रू. ८७,५००/- भरले. त्यानंतर त्यांनी आमच्याकडे रू. अडीच लाखाची मागणी केली. त्यानंतर आम्ही तो व्यवहार रदद करून दिलेल्या रक्कमेची मागणी केली. त्यांनी पैसे न दिल्याने आम्ही पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. परंतु पोलीसांनी त्यावर कार्यवाही न केल्यामुळे न्यायालयात तक्रार

(अ)सदाशिव हुलावळे
28.01.2026

दाखल केली आहे. या व्यतिरिक्त मला काही सांगावयाचे नाही.

.........................................

( अनिल सदाशीव हुलावळे,)

**साक्षीदाराची सही.**

| | |
|---|---|
| दि. २८/०१/२०२६. | **श्रवणोत्तर स्विकृत,** |
| साक्षीदारास **वाचून** दाखविले व बरोबर असल्याचे **मान्य केले.** | |
| 28.01.26 | |
| **(ए.एम.विभूते),**<br>सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,<br>वडगांव मावळ, पुणे. | **(ए.एम.विभूते),**<br>सह. न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,<br>वडगांव मावळ, पुणे. |